# जिल्हा व सत्र न्यायालय, जळगाव

## जिल्हा न्यायालयांकरीता मध्यवर्ती ऑनलाईन भरती प्रक्रीया-२०२३

**संदर्भ:-** १) विविध जिल्हा न्यायालयांचे आस्थापनेवरील रिक्त असलेली लघुलेखक (श्रेणी-३), कनिष्ठ लिपीक व शिपाई/हमाल ची रिक्त पदे भरणेचे दृष्टीने मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडून दि.०४.१२.२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली जाहीरात.

२) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील दि.२१/०५/२०२४ रोजी ई-मेल द्वारे प्राप्त झालेले पत्र.

**सूचना**

याद्वारे सर्व संबंधितांना सूचना करण्यात येते की, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी मा.सर्वोच्च न्यायालय येथे दाखल झालेल्या **Special Leave to Appeal (C) No(S). 11351/2024** मधील दि.१७/०५/२०२४ चे आदेश विचारात घेवून असे निर्देश दिले आहेत की, लघुलेखक (श्रेणी-३), कनिष्ठ लिपीक व शिपाई/हमाल ची रिक्त पदे भरण्यासाठी सुरु करण्यात आलेली मध्यवर्ती भरती प्रक्रीया-२०२३ पुढील आदेश होईपावेतो जैसे थे परिस्थितीत (Maintain "Status quo") ठेवण्यात यावी.

तरी जिल्हा व सत्र न्यायालय, जळगाव कडून सदर भरती प्रक्रीयेअंतर्गत लघुलेखक (श्रेणी-३) पदाकरीता दि.२३/०५/२०२४ व २५/०५/२०२४ रोजी नियोजण्यात आलेली अनुक्रमे लघुलेखन व टंकलेखन चाचणी परीक्षा तसेच दि.२७/०५/२०२४ रोजी नियोजण्यात आलेली तोंडी चाचणी परीक्षा घेता येवू शकणार नाही. याबाबत मा.उच्च न्यायालयाकडून पुढील निर्देश मिळाल्यानंतर त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल व तशी जिल्हा न्यायालय, जळगावचे सूचना फलक तसेच संकेतस्थळ **http://jalgaon.dcourts.gov.in** यावर सूचना प्रसिध्द करण्यात येईल.

संबंधीत उमेदवारांनी याची नोंद घ्यावी.

(एम.क्यु.एस.एम.शेख)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
जळगाव.

जळगाव
दिनांक:- २१ मे, २०२४